न्यूज एक्सप्रेस मराठी
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# कचऱ्यातून वीज निर्मितीचा आदर्श नमुना!

## पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मोशी 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पातून 14 मेगावॅट वीज निर्मिती

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेने कचऱ्याचे व्यवस्थापन आणि पुनर्वापर यासाठी मोठे पाऊल उचलत मोशी कचरा डेपो येथे अत्याधुनिक 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्प उभारला आहे. या प्रकल्पातून शहरातील कचऱ्यापासून १४ मेगावॅट क्षमतेची वीज निर्मिती केली जात आहे. 'बांधा-वापरा-हस्तांतरित करा' (बीओटी) तत्वावर उभारण्यात आलेला हा प्रकल्प मे. अँटोनी लारा रिन्यूएबल एनर्जी प्रा. लि. या कंपनीने ऑक्टोबर २०२३ मध्ये कार्यान्वित केला असून, पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासाच्या दिशेने हा एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.





ऑगस्ट २०२५ पर्यंत या प्रकल्पाद्वारे ३ लाख ४१ हजार १११ मेट्रिक टन कचऱ्यापासून तयार इंधन ( REFUSE DERIVED FUEL - RDF) वापरून १६ कोटी ६६ लाख ३६ हजार ७५० युनिट्स वीज निर्मिती करण्यात आली आहे. यापैकी, प्रकल्प संचालनासाठी आवश्यक वीज खर्च वगळता १५ कोटी ५७ लाख ४० हजार १९८ युनिट्स वीज महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या ग्रीडमध्ये पुरवण्यात आली आहे. ही वीज महापालिकेच्या रावेत व चिखली जल शुद्धीकरण केंद्र, कासारवाडी व चऱ्होली मैलाशुद्धीकरण केंद्रे तसेच थेरगाव रुग्णालयात 'ओपन ऍक्सेस' संकल्पनेतून वापरली जात आहे. याशिवाय महापालिकेचे सहा नवीन वीज ग्राहक ज्यामध्ये वाय.सी.एम. रुग्णालय, चिखली, भाटनगर, आकुर्डी, पिंपळेनिलख आणि चिंचवड येथील मैलाशुद्धीकरण केंद्रे हे देखील येथे ओपन ऍक्सेस द्वारे लवकरच जोडले जाणार आहेत. या उपक्रमामुळे आतापर्यंत ७६ कोटी ५७ लाख रुपयांची वीज बिलातील बचत महापालिकेला साधता आली आहे.

या प्रकल्पामुळे मोशी कचरा डेपोवरील कचऱ्याचा भार मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. कचऱ्यातून हरित उर्जानिर्मितीमुळे शहराला स्वच्छ आणि पर्यावरणपूरक भविष्य मिळत आहे. 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्प हा पिंपरीचिंचवडसाठी एक आदर्श आणि शाश्वत कचरा व्यवस्थापनाचा नमुना ठरत आहे. तरी नागरिकांनी घरगुती व औद्योगिक कचऱ्याचे योग्य वर्गीकरण करून या उपक्रमाला सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

> पिंपरी चिंचवड महापालिकेस सध्या आवश्यक असणारी विजेची गरज 'वेस्ट टू एनर्जी' आणि 'सोलर एनर्जी'सारख्या अपारंपरिक उर्जास्त्रोतांचा प्रभावी वापर करून पूर्ण करण्याचा म्हणजेच नेट झिरो शहर बनविण्याचा आमचा मानस आहे. या दिशेने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.
>
> - अनिल भालसाकळे, सह शहर अभियंता, पिंपरी-चिंचवड महापालिका.

### प्रकल्पाची वैशिष्ट्ये..

- प्रकल्प क्षमता: १४ मेगावॅट/प्रतितास
- एकूण निर्मित वीज: १६ कोटी ६६ लाख ३६ हजार ७५० युनिट्स (ऑगस्ट २०२५ अखेरपर्यंत)
- महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीला पुरवलेली वीज: १५ कोटी ५७ लाख ४० हजार १९८ युनिट्स
- वीज बील सवलतीस पात्र युनिट्स: १० कोटी ०२ लाख ५८ हजार ४५६
- महापालिकेची एकूण वीज बचत: ७६ कोटी ५७ लाख रुपये
- वीजनिर्मितीसाठी वापरलेला कचरा: ३ लाख ४१ हजार १११ मेट्रिक टन

# पिंपरी चिंचवड भाजप युवा मोर्चाकडून पुरग्रस्तांसाठी "एक हात मदतीचा"

## युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश यादव यांचा पुढाकार; 500 किटचे वाटप करणार

**पिंपरी | प्रतिनीधी**

गेल्या महिन्याभरात मराठवाडा भागांमध्ये पावसाने धुमाकूळ घातला. हातातोंडाला आलेले शेतातील उभे पीक पावसाने वाहून नेले. शेती अक्षरशः खरवडून निघाली. बळीराजाच्या या संकटात पिंपरी चिंचवड भाजप युवा मोर्चा नागरिक आणि शेतकरी बांधवांच्या सोबत असून पूरग्रस्तांसाठी एक हात मदतीचा दिला आहे. पिंपरी चिंचवड भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश लालचंद यादव यांनी सामाजिक बांधिलकी जपत पुरग्रस्त नागरिकांसाठी पुढाकार घेतला आहे.





पिंपरी चिंचवड भाजपा नेते तथा भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी-चिंचवड भाजप युवा मोर्चाचे अध्यक्ष दिनेश यादव व युवा मोर्चा पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने 500 मदत किट तयार करून पूरपरिस्थितीत अडकलेल्या बांधवांसाठी पाठविण्यात येणार आहेत.

या मदत किटमध्ये अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तू, स्वच्छतेसाठी साहित्य आणि काही वैद्यकीय सामग्रीचा समावेश आहे. पूरग्रस्त भागातील नागरिकांना तातडीची मदत मिळावी, यासाठी ही मोहीम हाती घेण्यात आली असल्याची माहिती यादव यांनी दिली.

> संकटाच्या काळात एकमेकांना मदतीचा हात देणं ही आपल्या संस्कृतीची ओळख आहे. पुरामुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. आम्ही फक्त एक छोटीशी मदत करण्याचा प्रयत्न केला आहे.
>
> – दिनेश यादव, अध्यक्ष, युवा मोर्चा- पिंपरी चिंचवड शहर.

# “महापालिका आहे, ग्रामपंचायत नाही”..

## चिखलीत खड्डेमय रस्त्यावर नागरिकांसह यश साने यांचे अनोखे आंदोलन..!

**पिंपरी | प्रतिनिधी**

अंगणवाडी रोड व चिंचेचा मळा ते वाघू साने चौक हा चिखली परिसरातील प्रमुख मार्ग पूर्णपणे खड्डेमय झाला असून नागरिक, विद्यार्थी व वाहनचालक यांना रोज त्यांचा जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. पावसाळा संपूनही रस्त्याचे डांबरीकरण न झाल्याने अखेर येथील नागरिकांनी युवा नेते यश साने यांच्या नेतृत्वात अनोख्या पद्धतीने आंदोलन केले.

तसेच दिवाळीच्या आधी रस्ता नाही झाला तर जनआंदोलन करण्यात असाही इशाराही देण्यात आला आहे. यासंदर्भात महापालिकेचे ‘फ’ क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील यांना निवेदन देण्यात आले. तसेच संबंधित विभागाशी समन्वय साधून लवकरात लवकर उपाययोजना करण्याचे आश्वासन त्यांनी यश साने यांना दिले आहे.






**महापालिका आहे ग्रामपंचायत नाही..**

रस्त्यावरील खड्डयांचे फोटो बॅनरवर छापून अंगावर अडकवून आंदोलकांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. या बॅनरवर ठळक अक्षरात लिहिले होते “पालिका आहे, ग्रामपंचायत नाही!” त्यासोबतच “खड्डे की रस्ते?” असा सवालही नागरिकांनी उपस्थित केला. यावेळी यश साने यांच्या सोबत रुपेश मोरे, विनायक बनसोडे, रुषी साने, रोशन पाणमंद, गणेश शिंदे, अशोक पवार हे ही आंदोलनात सहभागी झाले होते.

> अंगणवाडी रस्ता व चिंचेचा मळा ते वाघू साने चौक हा संपूर्ण रस्ता तातडीने नव्याने डांबरीकरण करावा. पावसाळी पाणी वाहून नेणाऱ्या वाहिनीचे काम पूर्ण झाले असून आता कोणतीही अडचण उरलेली नाही. तरीही काम होत नसल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. दिवाळीपूर्वी रस्ता डांबरीकरण झाला नाही, तर आम्ही मोठे जनआंदोलन करू. प्रशासन झोपेत असेल तर आम्ही त्यांना जागे करू.
>
> **– यश साने, युवा नेते.**

# पाणी मीटर बसविण्यास अडथळा आणल्यास थेट गुन्हे

## पाणीपुरवठ्याचे नियोजन आणि व्यवस्थापन सुधारण्यासाठी पाणी मीटर बसविण्याची मोहिम

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरातील पाणीपुरवठ्याचे नियोजन आणि व्यवस्थापन सुधारण्यासाठी पाणी मीटर बसविण्याची मोहिम हाती घेतली आहे. या मोहिमेत कोणत्याही व्यक्तीने किंवा समूहाने विरोध केला, तर त्यांच्यावर नियमानुसार गुन्हा दाखल करा. तसेच अनधिकृत नळजोडणी खंडित करण्याच्या कारवाईला गती द्या, असे निर्देश अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांनी दिले आहेत.




> पिंपरी-चिंचवड शहराला पुरवल्या जाणाऱ्या पाण्याचा प्रत्येक थेंब मोजला जाणे आवश्यक आहे. पाणी मीटरमुळे पाणी वापराची अचूक आकडेवारी मिळेल, ज्यामुळे पाणीपुरवठ्याचे नियोजन करणे आणि अपव्यय टाळणे शक्य होईल. नागरिकांनी या मोहिमेला सहकार्य करून पाणी मीटर बसवून घ्यावे.
>
> **- प्रदीप जांभळे-पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या आणि मर्यादित पाणीसाठा लक्षात घेता, शहरातील पाणीपुरवठ्याचे अचूक नियोजन करणे अत्यावश्यक आहे. शहरातील पाणीपुरवठ्याचा हिशोब ठेवण्यासाठी, पाण्याची गळती रोखण्यासाठी आणि अनधिकृत वापर टाळण्यासाठी, महापालिकेने सर्व प्रकारच्या नळजोडण्यांवर पाणी मीटर बसविणे अनिवार्य केले आहे. ही मोहीम महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाद्वारे राबवली जात आहे. या मोहिमेमुळे शहरातील प्रत्येक पाणीपट्टीधारकाची माहिती मिळेल आणि अनधिकृत नळजोडणी पूर्णपणे संपुष्टात येईल.

आतापर्यंत शहरात दहा हजारांपेक्षा अधिक अनधिकृत नळजोडणी असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे आता पाणी मीटर बसविण्याची मोहिम हाती घेण्यात आली आहे. घरगुती वापरासाठी मीटर व नळजोडणीचा खर्च पाणीपट्टीधारकांकडून पाणीबिलातून हप्त्याने वसूल केला जाणार आहे. पाणीपट्टीधारकांनी तात्काळ पाणी मीटर बसवून घ्यावे, असे आवाहन महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून करण्यात आले आहे.

याशिवाय शहरातील व्यावसायिक पाणी वापरावरही लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. हॉटेल्स, वॉशिंग सेंटर्स, बांधकामे, आर. ओ. प्लांट्स, रेस्टॉरंट्स आणि इतर सर्व व्यावसायिकांनी पिण्याच्या पाण्याचा अनधिकृत व्यावसायिक वापर तात्काळ थांबवावा. ज्यांनी अनधिकृत नळजोडणी घेतली आहे, त्यांनी ती त्वरित नियमित करून मीटर बसवावे, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

# पुणे महापालिका घेणार चक्क 90 लाखांचा 'रोबो' !

## शहरातील बेकायदा नळजोडांचा शोध घेण्यासाठी महापालिकेने भाडेतत्त्वावर रोबो घेतला आहे

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील बेकायदा नळजोडांचा शोध घेण्यासाठी महापालिकेने भाडेतत्त्वावर रोबो घेतला आहे. त्याचा वापर करून पाणीपुरवठा विभागाने वडगावशेरी भागातील गणेशनगर येथील ४० बेकायदा नळजोड शोधले आहेत. पाचशे मिलिमीटर व्यासाच्या मुख्य जलवाहिनीत तीनशे मीटर आत जाऊन हे नळजोड शोधण्यात आले. रोबोची उपयुक्तता पाहता एक रोबो खरेदीचा विचार महापालिका प्रशासनाने सुरू केला आहे.

अनधिकृत नळजोड शोधणाऱ्या रोबोची किंमत सुमारे ९० लाख रुपये असून, तीन वर्षे देखभाल दुरुस्तीचा खर्च, मनुष्यबळाचा खर्च लक्षात घेऊन हा खर्च दीड कोटी रुपयांपर्यंत जाणार आहे. शहराच्या जुन्या हद्दीसह महापालिकेत समाविष्ट झालेल्या नवीन गावांमध्ये मोठ्या प्रमाणात बेकायदा नळजोड असण्याची शक्यता आहे. यामुळे महापालिकेचा महसूल बुडतो. अनधिकृत नळजोडांमुळे पाणी नक्की किती वापरले जाते, याचा हिशेब लागत नाही. महापालिकेने वारंवार आवाहन करुनही नागरिक अधिकृत नळजोड घेण्यास टाळाटाळ करतात. बेकायदा नळजोडांमुळे पाण्याची होणारी गळती समोर येत नाही.

याला आळा घालण्यासाठी महापालिकेने अनधिकृत नळजोड शोधण्याची मोहीम हाती घेतली आहे. यासाठी पहिल्या टप्प्यावर पालिकेने भाडेतत्त्वावर रोबोचा वापर करून पाणीगळती आणि अनधिकृत नळजोड शोधण्याचा प्रयत्न केला. हा रोबो रिमोटच्या सहाय्याने काम करतो. रोबोला चार चाक, कॅमेरा, लाईट आहे. तो जलवाहिनीत सोडल्यावर जलवाहिनीचे निरीक्षण करतो. हे सर्व चलचित्र एका पडद्यावर मोठ्या आकारात दिसते. त्यामुळे नक्की कोणी बेकायदा नळजोड घेतले आहे, हे समोर येत आहे.

प्रशासनाने वडगाव शेरी येथील गणेशनगरजवळ असलेल्या पाचशे मिलिमीटर व्यासाच्या मुख्य जलवाहिनीत रोबो सोडला होता. त्या वेळी दोन ठिकाणी पाण्याची गळती आढळली. मुख्य वाहिनीवर बंदी असतानाही ४० बेकायदा नळजोड घेण्यात आल्याचे आढळले. अनधिकृत नळजोड तोडून टाकण्यात आल्याचे महापालिकेतील अधिकाऱ्यांनी सांगितले.

यावेळी पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे अधीक्षक अभियंता वीरेंद्र केळकर, कार्यकारी अभियंता एकनाथ गाडेकर, कनिष्ठ अभियंता नितीन जाधव, रवींद्र वानखेडे, रामदास आढारी उपस्थित होते.

दरम्यान, शहरातील बेकायदा नळजोडांचा शोध घेण्यासाठी महापालिकेने भाडेतत्त्वावर रोबो घेतला आहे. त्याचा वापर करून पाणीपुरवठा विभागाने वडगावशेरी भागातील गणेशनगर येथील ४० बेकायदा नळजोड शोधले आहेत. 'रोबो खरेदीचा विचार पालिका करीत आहे. मात्र, उघडपणे ज्यांचे बेकायदा नळजोड दिसतात, त्यांच्यावर कारवाई होत नाही. शहरात हजारोंच्या संख्येत बेकायदा पद्धतीने नागरिक राहतात. प्रशासनच त्यांना पाणी, वीज पुरवते. राजकीय आश्रयाने बेकायदा राहणाऱ्यांवर प्रथम पालिकेने कारवाई करून दाखवावी आणि मगच रोबोसारख्या महागड्या वस्तूंचा विचार करावा,' अशी प्रतिक्रिया एका वाचकाने नाव न देण्याच्या अटीवर दिली.



### रोबो महत्त्वपूर्ण भूमिका बजाविणार

» **शहरातील कोणत्या भागात किती जणांनी बेकायदा नळजोड घेतले, याची स्पष्ट आकडेवारी महापालिकेकडे उपलब्ध नाही. त्यामुळे नागरिकांना प्रतिव्यक्ती किती पाणी मिळते, याचे मोजमाप शक्य होत नाही. याला आळा बसावा, यासाठी बेकायदा नळजोड शोधणे आवश्यक आहे. त्यासाठी रोबो महत्त्वपूर्ण भूमिका बजाविणार असल्याचे पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.**

> **रोबोमुळे वेगवेगळ्या भागांतील बेकायदा नळजोड, जलवाहिनीची गळती शोधता येते. त्यामुळे महापालिका लवकरच एक रोबो खरेदी करणार आहे. या रोबोची किंमत सुमारे ९० लाख रुपये असून, तीन वर्षांचा देखभाल दुरुस्ती, मनुष्यबळासह हा खर्च दीड कोटी रुपयांच्या पुढे जाण्याची शक्यता आहे. रोबो खरेदीसाठी लवकर निविदा काढली जाणार आहे.**
>
> **- नंदकिशोर जगताप, पाणीपुरवठा विभागप्रमुख, पुणे महानगरपालिका**

# पुण्यात बेकायदा फलक लावणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यास सुरुवात

## रस्त्यावरदररोज पाच जणांवर गुन्हे दाखल करण्याचे दिले आदेश, बेकायदा फ्लेक्सबाजी विरोधात कारवाईचे आदेश देण्यात आले

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेची परवानगी न घेता जाहिरात फलक लावणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यास सुरुवात करण्यात आली असून, पहिल्या दोन दिवसांत २७ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ७१ जणांवर गुन्हे दाखल करण्यासाठी महापालिकेने पोलिसांना पत्र दिले आहे. ही कारवाई येणाऱ्या काळात अधिक कडक केली जाणार असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी दिली.

शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांसह चौकांमध्ये बेकायदा पद्धतीने उभारण्यात आलेल्या जाहिरात फलकांवर कारवाई करणार असल्याचे महापालिकेने जाहीर केले होते. बेकायदा फलक लावणाऱ्यांविरोधात गुन्हे दाखल करण्याचे आदेश महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी काढले आहेत. महापालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयाचे प्रमुख सहाय्यक आयुक्तांवर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.

आयुक्तांच्या आदेशानंतर अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी यांच्यासह आकाशचिन्ह आणि परवाना विभागाचे उपायुक्त माधव जगताप यांच्यासह पाच झोनचे उपायुक्त रस्त्यांवर उतरले आहेत. गेल्या चार ते पाच दिवसांमध्ये शहराच्या विविध भागांमध्ये बेकायदा जाहिरात फलक काढून टाकण्याची मोहीम हाती घेत पाच हजारांपेक्षा अधिक फलक हटविण्यात आले आहेत. ७१ प्रकरणांत पोलिसांना संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याबाबत महापालिकेकडून पत्र देण्यात आले आहे.

'महापालिकेने दिलेल्या पत्राच्या आधारावर २७ प्रकरणांत पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत,' अशी माहिती पृथ्वीराज बी. पी. यांनी दिली. बेकायदा जाहिरात फलक लावणाऱ्यांवर कारवाई करण्यास सुरुवात झाली आहे. महापालिकेने ७१ जणांवर गुन्हे दाखल करण्यासाठी पत्र पोलिसांना दिले आहे. त्यापैकी २७ जणांवर आतापर्यंत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, असे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी पी यांनी सांगितले.



### राजकीय फलकांना अभय ?

»**महापालिकेच्या आगामी निवडणुकांसाठी इच्छुक असलेल्यांनी मो ठ्या प्रमाणात शहरभर बेकायदा फलक लावले आहेत. मात्र, फलकांवर कारवाई करताना राजकीय पक्षांच्या फलकांकडे दुर्लक्ष करून व्यावसायिकांनी लावलेल्या फलकांवर कारवाई केली जात असल्याचा आरोप केला जात आहे. प्रशासन कारवाई करताना दुजाभाव करीत असल्याचे पुरावे आयुक्त नवल किशोर राम यांना देणार असल्याचेही काही व्यावसायिकांनी सांगितले.**

# राजगुरुनगर नगर परिषदेत प्रभागात महिलांना जास्त संधी

## मुख्याधिकारी अंबादास गर्कळ यांनी आरक्षण सोडत काढली, महिलांसाठी 11 तर पुरूषांसाठी 10 जागा आरक्षित झाल्या

**पुणे | प्रतिनिधी**

राजगुरूनगर नगर परिषदेच्या निवडणुकीतील १० प्रभागातील २१ नगरसेवकपदाच्या जागांसाठी प्रांत अधिकारी अनिल दौंडे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याधिकारी अंबादास गर्कळ यांनी आरक्षण सोडत काढली. महिलांसाठी ११ तर पुरुषांसाठी १० जागा आरक्षित झाल्या आहेत. नगराध्यक्ष पद सर्वसाधारण जागेसाठी यापूर्वीच आरक्षित झाले आहे.

आरक्षण सोडतीसाठी माजी नगराध्यक्ष बापू थिगळे,माजी सरपंच प्रदीप कासवा, माजी नगरसेविका रेखा क्षोत्रिय, संपदा सांडभोर, मनोहर सांडभोर, मंगेश गुंडाळ, सागर सातकर, राहुल पिंगळे यांच्यासह कमी संख्येने इच्छुक, त्यांचे समर्थक आणि नागरिक उपस्थित होते. आरक्षण सोडत चिठ्ठी काढून काढण्यात आले. नगर परिषदेचे अधीक्षक राहुल लामखडे, साधना शिंदे, विद्या वऱ्हाडी, अमर मारणे, धनश्री राऊत, गणेश देव्हरकर, माधुरी पाटील, उर्मिला दुधाळे यांनी आरक्षण सोडतीसाठी नियोजन केले.




### राजगुरुनगर नगर परिषेदेचे आरक्षण

» राजगुरुनगर नगर परिषेदेचे १० प्रभागातील २१ जागांचे आरक्षण पुढील प्रमाणे (कंसात मतदार संख्या) : प्रभाग एक (२३८०मतदार) : नामाप्र, सर्वसाधारण (महिला), प्रभाग दोन (२६०१ मतदार) : नामाप्र, सर्वसाधारण (महिला), प्रभाग तीन (२०७६ मतदार) : सर्वसाधारण (महिला), सर्वसाधारण, प्रभाग चार (२०९७ मतदार) : सर्वसाधारण (महिला),सर्वसाधारण प्रभाग पाच (२६०१ मतदार) : सर्वसाधारण (महिला), सर्वसाधारण, प्रभाग सहा (१३२६ मतदार) : नामाप्र (महिला), सर्वसाधारण प्रभाग सात (३४४१ मतदार) : अनुसूचित जमाती (महिला), नामाप्र, सर्वसाधारण (महिला) प्रभाग आठ (२६६९मतदार): नामाप्र (महिला), सर्वसाधारण प्रभाग नऊ (३८९३ मतदार) : नामाप्र (महिला), सर्वसाधारण प्रभाग दहा (२७८६ मतदार : अनुचित जाती, सर्वसाधारण (महिला).

राजगुरूनगर नगर परिषदेमध्ये ११ महिला नगर सेवक निवडून येणार आहेत. तर दहा नगरसेवक पुरुषांमधून निवडण्यात येणार आहेत. नगर सेवक आरक्षण सोडतीकडे शहरातील नागरिकांचे लक्ष लागले होते. मात्र, प्रत्यक्षात आरक्षण सोडतीकडे महिलांसह नागरिकांनी पाठ फिरवली. तब्बल ११ जागांवर महिला नगरसेवक असल्या तरी त्यांचे पतीदेव कारभार पाहणार, हे या आरक्षण सोडतीवरून लक्षात येत आहे. केवळ ७ महिला आरक्षण सोडतीसाठी उपस्थित होत्या.

तालुक्याची राजधानी समजल्या जाणाऱ्या राजगुरुनगर नगर शहरात पाणी, कचरा, रस्ते, आरोग्य आदी सेवा सुविधांचा अभाव आहे. निवडून येणाऱ्या नगरसेवक व नगराध्यक्षापुढे हे प्रश्न सोडवण्याचे मोठे आव्हान असणार आहे. राजकीय दृष्ट्या राजगुरुनगर नगर परिषदेच्या निवडणुकीकडे राजकीय पक्षांच्या नेत्याचे लक्ष राहिले आहे. निवडणुकीसाठी मतांचे राजकारण करताना शहरातील अनेक प्रश्न प्रलंबित राहिल्याने येऊ घातलेल्या निवडणुकीत कोणत्या उमेदवाराला मतदार संधी देणार कोणता पक्ष सत्तेत येणार हे निवडणुकीनंतर स्पष्ट होणार असले तरी सत्तेची गणिते करण्यात राजकीय नेते आता गुंतणार आहेत राजगुरूनगर नगर परिषदेच्या निवडणुकीतील १० प्रभागातील २१ नगरसेवकपदाच्या जागांसाठी प्रांत अधिकारी अनिल दौंडे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याधिकारी अंबादास गर्कळ यांनी आरक्षण सोडत काढली.

### प्रलंबित कामे कळीचा मुद्दा ठरणार

» निवडणुकीसाठी मतांचे राजकारण करताना शहरातील अनेक प्रश्न प्रलंबित राहिल्याने येऊ घातलेल्या निवडणुकीत कोणत्या उमेदवाराला मतदार संधी देणार कोणता पक्ष सत्तेत येणार हे निवडणुकीनंतर स्पष्ट होणार असले तरी सत्तेची गणिते करण्यात राजकीय नेते आता गुंतणार आहेत तर निवडणुकीची तारीख प्रसिद्द होईपर्यंत मतदारांना आपल्याकडे खेचण्याची स्पर्धा मात्र सुरू होणार आहे.

# जिल्ह्यातील 16 पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या

## बारामती तालुका पोलिस ठाण्याच्या पदभार चंद्रशेखर यादव यांच्याकडे तर वैशाली पाटील यांची वर्षभरात बदली

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्हा पोलिस दलातील ११ पोलिस निरीक्षकांच्या पोलिस अधिक्षक संदीपसिंह गिल्ल यांनी बदल्या केल्या. पाच सहाय्यक पोलिस निरीक्षकांच्याही बदल्या करण्यात आल्या. बहुचर्चित बारामती तालुका पोलिस ठाण्यातील पोलिस निरीक्षक वैशाली पाटील यांची वर्षभरातच बदली करण्यात आली आहे. बारामती वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांची तेथे नेमणूक करण्यात आली आहे.

जिल्हा पोलिस अधिक्षकांनी बुधवारी (दि.८) रात्री उशीरा बदल्यांचे आदेश जारी केले. अन्य पोलिस निरीक्षकांच्या बदल्या पुढीलप्रमाणे




- (कोठून कुठे) : कुमार रामचंद्र कदम (वडगाव मावळ ते सासवड), सचिन दत्तात्रय वांगडे (हवेली ते उरुळी कांचन), रवींद्र दत्तात्रय पाटील (कामशेत ते नियंत्रण कक्ष), सपोनि महादेव चंद्रकांत शेलार (नारायणगाव ते स्थानिक गुन्हे शाखा), अभिजित सुभाष देशमुख (परकीय नागरिक नोंदणी कक्ष ते वडगाव मावळ), वैशाली रावसाहेब पाटील (बारामती तालुका ते हवेली), शंकर मनोहर पाटील (उरुळीकांचन ते कामशेत), चंद्रशेखर मोहनराव यादव (बारामती वाहतूक ते बारामती तालुका), श्रीशैल रामचंद्र चिवडशेट्टी (नियंत्रण कक्ष ते बारामती वाहतूक), ऋषिकेश भाऊसाहेब अधिकारी (सासवड ते नियंत्रण कक्ष), सपोनि नितीन हनुमंत खामगळ (वेल्हा ते नियंत्रण कक्ष). सपोनि प्रवीण महादेव सपांगे (यवत ते नारायणगाव), किशोर विठ्ठल शेवते (वाचक अपोअ, पुणे ते वेल्हा), सपोनि गजानन रतन चेके (वाचक उविपोअ बारामती ते नियोजित पोलिस ठाणे निरा-नृसिंहपूर)

### कर्तव्यातील कसूर वैशाली पाटील यांना भोवली

» बारामती तालुका पोलिस ठाण्यात नुकतीच झालेली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई आणि अन्य प्रकरणांमुळे पोलिस निरीक्षक वैशाली पाटील यांच्या कार्यपद्धतीबद्दल नाराजी व्यक्त केली जात होती. जिल्हा पोलिस अधिक्षकांनी त्यांच्यावर कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत त्यांना खुलासा सादर कऱण्याचेही नुकतेच आदेश दिले होते. त्यामुळे त्यांची बदली होणार अशी चर्चा होती, ती अखेर खरी ठरली. दुसरीकडे बारामती वाहतूक शाखेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱया चंद्रशेखर यादव यांना बारामती तालुका पोलिस ठाण्यात संधी दिली गेली. यादव यांनी वाहतूक शाखेतही आपल्या कामाचा ठसा उमटवला होता.